# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ४३ वी बैठक दिनांक १३ एप्रिल २००५

## ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली व मा. ना. अजित पवार, मंत्री, जलसंपदा (कृखोपाम वगळून) यांचे उपस्थितीत नियामक मंडळाची ४३ वी बैठक दि. १३.४.२००५ रोजी विधानभवन, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

**ठराव क्र. ४३/१**

**"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ४२ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."**

**ठराव क्र. ४३/२**

**"महामंडळाची आर्थिक स्थिती हा विषय नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केलेला असल्याने याबाबत ठराव करण्यात आला नाही."**

ठराव क्र. ४३/३

**"ठराव करण्यांत येतो की, श्री. प्र. ना. बेहेरे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची महामंडळाचे कायदे सल्लागार म्हणून दि. १.४.२००५ ते ३१.३.२००६ या कालावधीसाठी ठोक एकरकमी सल्ला फी रु. ८,०००/- प्रतिमाह देण्याच्या अटीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या मान्यतेने केलेल्या नेमणूकीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

ठराव क्र. ४३/४(१)

**"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या ताब्यात असलेली नीरा डावा कालवा किमी. ८१ मधील स.नं. १३३,४३, ४८,६०,५८ व ५९ लगतची १३.१८ हे. जागा विद्या प्रतिष्ठान, बारामती या संस्थेस शैक्षणिक कार्यासाठी देण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे हस्तांतरण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) | कार्यकारी संचालक |
| व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे | म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

ठराव क्र. ४३/४(२)

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या ताब्यात असलेली नीरा डावा कालवा किमी. ८० मधील स.नं. ११३ व ११४ मधील १.४५ हे. जागा विद्या प्रतिष्ठान, बारामती या संस्थेस बागेसाठी देण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे हस्तांतरण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४३/४(३)

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या ताब्यात असलेली नीरा डावा कालवा किमी. ७७ मधील सर्व्हे नं. २७० मधील २.१० हे. जागा अनंत स्मृती प्रतिष्ठान व संशोधन केंद्र, बारामती या संस्थेस अपंग पुनर्वसन व इतर लोकहितार्थ कामासाठी देण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे हस्तांतरण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४३/४(४)

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या ताब्यात असलेली मुठा डावा कालवा किमी. १४ लगतची शेतकी महाविद्यालय, शिवाजीनगर पुणे येथील १ हे. जागा अनंत स्मृती प्रतिष्ठान व संशोधन केंद्र, बारामती या संस्थेस बांधकाम व वनीकरणासाठी देण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे हस्तांतरण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४३/४(५)

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या ताब्यात असलेली वरसगांव धरण परिसरातील स.नं. २१, २२, २३, २६, २७, ३४,४१,४२,४३,११८,११९ व १२५ मधील १२.३६८ हे. जागा लवासा कॉर्पोरेशन लि.या संस्थेस पर्यटन विकासासाठी विकत देण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे हस्तांतरण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४३/४(६)

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या ताब्यात असलेली मौजे जळोची, तालुका बारामती येथील नीरा डावा कालवा किमी. ८१ मधील स.नं. ५४ ते ५९ लगतची ३ एकर जागा शरदचंद्रजी स्काउट ॲण्ड गाईड ट्रेनिंग सेंटर, बारामती या संस्थेस देण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे हस्तांतरण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) | कार्यकारी संचालक |
| व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे | म.कृ.खो.वि.म. पुणे |

ठराव क्र. ४३/४(७)

"ठराव करण्यांत येतो की, गोवर्धन आयुर्फार्मा व गोवर्धन वैद्यक संशोधन संस्था, पुणे यांचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव अपूर्ण असल्याने सदर विषय मागे घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४३/५

"ठराव करण्यांत येतो की, महसूल खात्याकडे जमा असलेली रक्कम (बुडीत क्षेत्रातील खातेदारांना पर्यायी जमीन देण्यासाठी त्यांचेकडून ठेव म्हणून घेतलेली ६५ टक्के रक्कम) महसूल खात्याकडून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे जमा करणेबाबत शासन स्तरावरुन महसूल खात्यास कळविण्यात यावे."

ठराव क्र. ४३/६

"ठराव करण्यांत येतो की,

(१) जानेवारी २००५ ते जून २००५ मध्ये म्हैसाळ टप्पा-१,२ व ३ चे आवश्यक पंप चालू करुन ४ आवर्तनाद्वारे अंदाजे १,२३९ हेक्टर क्षेत्रांस पाणी देण्याच्या नियोजनास विशेष बाब म्हणून नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.

(२) वरील (१) प्रमाणे पाणी देण्यासाठी रु. ४,९५०/- प्रति हेक्टर प्रति आवर्तन या दराने आकारणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(३) वरील (२) प्रमाणे वसूल झालेल्या रकमेतून जानेवारी २००५ ते जून २००५ मध्ये म्हैसाळ टप्पा-१,२ व टप्पा-३ च्या चालू केलेल्या पंपाची वीज देयके अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

ठराव क्र. ४३/७

"ठराव करण्यांत येतो की, मौजे कुशी, तालुका सातारा गावातील तारळी प्रकल्पांतर्गत बाधित प्रकल्पग्रस्तापैकी श्री. अडसूळ व इतर ३४ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणेसाठी करावयाच्या नागरी सुविधांच्या कामापोटी करावयाच्या रुपये १०.६० लक्ष वाढीव खर्चास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

ठराव क्र. ४३/८

"ठराव करण्यांत येतो की,

अ. महामंडळांतर्गत प्रकल्पांना नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी ११ अंतर्गत कर्जसहाय्य मंजूर होण्याचे दृष्टीने शासन स्तरावरुन प्रयत्न व्हावेत व कामासाठी शासनाकडून "मॅचिंग ग्रँट" उपलब्ध व्हाव्यात, की जेणेकरुन प्रकल्पांची कामे पूर्ण करता येतील व त्या योगे नाबार्डकडून प्रतिपूर्ती घेता येईल.

ब. नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी ७ व ८ अंतर्गत एकूण २३ लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी कर्जसहाय्य मंजूर झाले आहे. या कामावरील खर्चासाठी शासनाकडून "मॅचिंग ग्रँट" मिळणे आवश्यक आहे. जेणेकरुन उर्वरित कामे पूर्ण करता येतील व त्यायोगे नाबार्डकडून शासनास प्रतिपूर्ती घेता येईल"

ठराव क्र. ४३/९

"ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी रु. २६६ कोटी रक्कम भूसंपादन व पुनर्वसनासाठी विशेष अंशदान म्हणून शासनाने मंजूर करावे अशी नियामक मंडळाची शिफारस आहे."

ठराव क्र. ४३/१०

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या कार्यकक्षेतील प्रकल्पांसाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाचे स्वामित्व शुल्क महसुल विभागास देणेकरीता रु. १९५.७६ कोटीचे विशेष अनुदान शासनाने मंजूर करावे अशी नियामक मंडळाची शिफारस आहे."

ठराव क्र. ४३/११

"ठराव करण्यांत येतो की,

१. चिल्हेवाडी प्रकल्पाची शिर्षकामे कंत्राटदाराकडून पूर्ण करुन घेऊन निविदेतून कालव्याची कामे वगळून निविदा अंतिम करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने कार्यकारी संचालक यांना देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. कालव्याची कामे नवीन निविदेमार्फत पूर्ण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे